23-03-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 03/22/2025 10:42 PM Page 1



# विद्यार्थ्यांनी डिजीटल कौशल्य आत्मसाद करावीत

## प्रा. सुनील गावडे यांचे प्रतिपादन : साखळी महाविद्यालयात विशेष व्याख्यान

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. २२ :** सध्याचा काळ हा प्रचंड गुंतागुंतीचा आणि व्यावसायिक स्पर्धात्मक काळ असून या काळामध्ये डिजिटल कौशल्य शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले असून विद्यार्थ्यांनी ते आत्मसाद करावेत, असे प्रतिपादन कॉमटेक संगणक अकादमी फोंडा येथील प्राध्यापक सुनील गावडे यांनी केले. ते

कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, साखळी येथील वाणिज्य विभागार्ते विद्यार्थ्यांसाठी कौशल्य वाढ जागरुकता अभ्यासक्रम या विषयावर आयोजित केलेल्या विशेष व्याख्यानात मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा.प्रशांत भोसले उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा. सुनील गावडे यांनी गुगल मीट, झूम, गुगल डॉक्स, मायक्रोसॉफ्ट, मॅथ सॉल्व्हर, गुगल स्प्रेडशीट आदींवर ऑनलाईन सभा आयोजित करणे यांसारख्या मूलभूत डिजिटल कौशल्यावर चर्चा केली.



साखळी : विद्यार्थ्यांसाठी कौशल्य वाढ जागरुकता अभ्यासक्रम या विषयावर मांडणी करताना कॉमटेक संगणक अकादमीचे प्रा.सुनील गावडे.

यावेळी प्रा. सुनील गावडे यांनी शेती, वित्त, आरोग्यसेवा इत्यादीमध्ये वापरल्या जाण्या एआय टूल्सवर चर्चा केली. यावेळी ते म्हणाले की आयबीएम वॉटसन ॲपच्या माध्यमातून कर्करोगाचे अचून निदान होऊ शकते.

**विविध अभ्यासक्रमांची माहिती**

प्रा. सुनील गावडे आपल्या विवेचनात म्हणाले की, मायक्रोसॉफ्टने कोपायलट ॲप लाँच केले असून ते ऑफिस डॉक्युमेंट्सचे एआय पॉवर्ड फ्युचर आहे. याशिवाय प्रा.सुनील गावडे यांनी टॅली प्राईम ५.०, ॲडव्हान्स एक्सेल, एसएपी गुगल वर्कस्पेस विथ ए आय, ग्राफिक डिझाईन इत्यादी अभ्यासक्रमाबद्दल माहिती दिली.

# ‘एनईपी’ अंतर्गत कोणतीही भाषा लादली जाणार नाही

टीम दैनिक हेराल्ड

▶ केंद्रीय मंत्री मजुमदार यांच्याकडून स्पष्ट

**मडगाव, दि. २२ :** राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० अंतर्गत त्रिभाषिक सूत्रावर कोणतीही भाषा सक्तीने लादली जाणार नाही, असे स्पष्ट विधान केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री सुकांता मजुमदार यांनी राज्यसभेत केले आहे. त्यांच्या या स्पष्टीकरणाचे ’ग्लोबल रोमी लिपी अभियान’ (जीआरएलए) तर्फे स्वागत करण्यात आले आहे. हे विधान तमिळनाडूमध्ये त्रिभाषिक धोरणाच्या नावाखाली हिंदी लादली जात असल्याच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर आले आहे.

जीआरएलएच्या मते, एनईपी राज्यांना त्यांच्या शालेय अभ्यासक्रमासाठी तीन भाषा निवडण्याचे स्वातंत्र्य देते. गोव्यात, या प्रस्तावित भाषा पर्यायांमध्ये कोकणी (पहिली भाषा), इंग्रजी (दुसरी भाषा) आणि मराठी (तिसरी भाषा) यांचा समावेश आहे. मात्र, जीआरएलएने यावर भर दिला आहे की, कोकणी ही पहिली भाषा म्हणून स्वीकार्य असली तरी विद्यार्थ्यांना ती देवनागरी किंवा रोमन यापैकी कोणत्याही पसंतीच्या लिपीत शिकण्याचे स्वातंत्र्य असावे. रोमन लिपीच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी आणि चालू असलेल्या लिपी वादावर तोडगा काढण्यासाठी ही मागणी महत्त्वाची असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. केंद्रीय मंत्र्यांनी स्पष्ट केले की, एनईपी अंतर्गत भाषा निवडीचा निर्णय केंद्र सरकारचा नसून राज्य सरकार आणि विद्यार्थ्यांचा असेल. त्यामुळे कोणत्याही विशिष्ट भाषेची सक्ती केली जाणार नाही. जीआरएलएने गोवा सरकारला शालेय अभ्यासक्रमात रोमन लिपी कोंकणीचा समावेश करण्यासाठी आवश्यक कायदेशीर निर्णय किंवा ठराव मंजूर करण्याचे आवाहन केले आहे. संघटनेच्या मते, एनईपीच्या चौकटीत शाळांना त्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अभ्यासक्रम ठरविण्याची मुभा आहे, त्यामुळे इच्छुक संस्थांना रोमन लिपीत कोंकणी शिकवता येईल.

पान १ वरून

## ‘सेव्ह ओल्ड गोवा’ संघटनेचा निषेध मोर्चा!

दरम्यान, शनिवारी ओल्ड गोवा येथील एका जुन्या चर्चच्या अवशेषांवर उत्खनन सुरू असल्याचे समोर आले. सेव्ह ओल्ड गोवा ॲक्शन कमिटीचे सदस्य एव्हारिस्टो रॉड्रिग्ज यांनी बॉम जीसस बॅसिलिकासमोर अनधिकृत बांधकाम सुरू असल्याची तक्रार पोलिसांत दाखल केली. या ठिकाणी जड यंत्रसामग्रीच्या साहाय्याने उत्खनन सुरू असून, मोठ्या प्रमाणावर पुरातत्त्वीय अवशेष बाहेर नेण्यात आले आहेत. ही जागा हेरिटेज आणि पुरातत्त्व विभागाच्या संरक्षणाखाली आहे, त्यामुळे कोणतेही बांधकाम पुरातत्त्व खाते आणि चर्च अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय करता येऊ शकत नाही,असे रॉड्रिग्ज यांनी सांगितले. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी घटनास्थळी पाहणी करताना उत्खननाच्या ठिकाणी तोफगोळे सापडल्याचा दावाही केला आहे. ही बाब अधिक गांभीर्याने घेतली जावी आणि ओल्ड गोव्याच्या ऐतिहासिक वारशाचे संरक्षण व्हावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# इनोव्हेटिव्ह आयडिया चॅलेंज २०२५ उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २२ :** उच्च शिक्षण संचालनालय, पर्वरी आणि गोवा सरकारच्या स्टार्टअप आणि आयटी प्रमोशन सेलच्या सहकार्याने गोवा राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय कौशल्यांची वाढ व्हावी यासाठी कन्व्हर्ज २.० अंतर्गत इनोव्हेटिव्ह आयडिया चॅलेंजचे आयोजन रवींद्र भवन मडगाव येथे करण्यात आलेले होते. विद्यार्थ्यांकडून या कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. राज्यातील विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय प्रतिभेला अधिक व्यापक प्रमाणात चालना मिळावी यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# वळवईत २८ पासून नाट्यमहोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. २२ :** गजान्तलक्ष्मी क्रीडा आणि सांस्कृतिक मंडळ, वळवई आणि कला व संस्कृती विभाग, गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने मास्टर दत्ताराम बापू यांच्या स्मृतिप्रित्यर्थ नाट्यमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा नाट्यमहोत्सव येत्या दि. २८, २९ व ३० मार्च रोजी वळवई येथे होईल.

शुक्रवार, दि. २८ मार्च रोजी संध्याकाळी ६ वा. उद्घाटन समारंभ होणार असून या सोहळ्यास कला व संस्कृती मंत्री गोविंद गावडे, जिल्हा पंचायत सदस्य श्रमेश भोसले, सरपंच विनायक वेंगुर्लेकर, अन्य पंचसदस्य, तारी सोसायटी व गजान्तलक्ष्मी संस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर तारी उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी वळवई गावातील ज्येष्ठ नाट्यकलाकारांचा सन्मान सोहळा होणार आहे.

दरदिवशी संध्याकाळी ७:३० वा. नाटक सादरीकरण होईल. २८ रोजी ’प्यादी झाली फर्जंद ’ सादरकर्ते: श्री होमकुंड रंगभूमी मडकई , २९ रोजी ’नटसम्राट ’ सादरकर्ते: साई पूर्वा आर्ट्स गोवा, ३० रोजी ’स्वराज सूर्य ’ सादरकर्ते: गजान्तलक्ष्मी क्रीडा आणि सांस्कृतिक मंडळ वळवई अशी तीन नाटके होईल.

# केपे सरकारी पर्रीकरांना आदरांजली

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. २२ :** कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालयातील एनएसएस विभागाच्यावतीने गोव्याचे माजी मुख्यमंत्री आणि देशाचे माजी संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली. प्राणीशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापक आणि एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ.कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

त्यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर यांच्याहस्ते मनोहर पर्रीकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. देशाचे माजी संरक्षणमंत्री आणि गोव्याचे माजी मुख्यमंत्री राहिलेल्या मनोहर पर्रीकर यांचे नेतृत्व दूरदर्शी होते. त्यांनी अत्याधुनिक सुविधांसह सरकारी शिक्षण संस्थांचे आधुनिकीकरण केले, असे उद्गार आपल्या मनोगतात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर यांनी काढले. बदल आणि विकासाचे साधन म्हणून मनोहर पर्रीकर यांनी शिक्षणाकडे पाहिले. शिक्षणाविषयीच्या त्यांच्या दृष्टिकोनाचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून केपे सरकारी महाविद्यालयाने गोव्यातील अग्रगण्य शिक्षणसंस्था होण्याचा मान मिळवण्यासाठी प्रयत्न करावेत. त्या अनुषंगाने विविध उपक्रम आखावेत असेही प्राचार्य डॉ. प्रवीणा केरकर यावेळी म्हणाल्या. डॉ. दीपा प्रजापती यांनी आभार मानले.



केपे : माजी संरक्षणमंत्री आणि गोव्याचे माजी मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केल्यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर. सोबत एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. कुलकर्णी, डॉ. दीपा प्रजापती व मान्यवर.

# गावडोंगरी बाजार ते इंदावाडा रस्त्याचे हॉटमिक्स डांबरीकरण सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २२ :** काणकोण मतदारसंघातील सर्व भागात पायाभूत सुविधा वाढविणे, स्थानिक समुदायाची कनेक्टिव्हिटी वाढविणे यासाठी आपण प्राधान्य देत आलो आहे. पुढील २ वर्षात सर्व विकासकामे पूर्ण करण्यात येईल. नडके येथील रस्ता व केरी येथे भूमिगत वीजवाहिन्यातून वीजपुरवठा लवकरच करण्यात येईल, असे प्रतिपादन सभापती रमेश तवडकर यांनी केले.

गावडोंगरी पंचायत क्षेत्रांतील गावडोंगरी बाजार ते इंदावाडा पर्यंतच्या रस्त्याचे सुमारे १ कोटी ६७ लाख खर्चून हॉटमिक्स डांबरीकरण कामाचे उद्घाटन केल्यानंतर सभापती तवडकर बोलत होते.

यावेळी त्यांच्यासह स्थानिक सरपंच धिल्लन देसाई, पैंगीणच्या सरपंच सविता तवडकर, मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर गावकर, सदस्य सिद्धार्थ देसाई, पंचसदस्य व अन्य उपस्थित होते.

सभापती तवडकर म्हणाले की, तळपण येथे सर्व सोयीसुविधा युक्त असे तटरक्षक पोलिस दलाच्या रु.१ कोटी ७२ लाख खर्च करून इमारत प्रकल्पाची



पायाभरणी करण्यात आली आहे. एका वर्षात हा प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे. लवकरच सर्व प्रशासकीय कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी एक प्रशस्त अशी इमारत मामलेदार कार्यालयासमोरील जागेत रु. ५ कोटी खर्च करून उभी राहणार आहे. ते काम समान महिन्यात सुरू होईल. त्यामुळे काणकोण विकास कामात मागे रहाणार नाही याची पूर्ण दक्षता घेतली जात आहे.

# शैक्षणिक लेखन कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा समारोप

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ –साखळी महाविद्यालयातील हिंदी आणि ग्रंथालय विभागातर्फे आयोजन

**साखळी, दि. २२ :** कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथील हिंदी (युजी आणि पिजी), हिंदी संशोधन केंद्र आणि ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक लेखन कौशल्य : योग्य संदर्भ, उद्धरण आणि साहित्यिक चोरी प्रतिबंध या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. या अभ्यासक्रमासाठी एकूण ४८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता. हिंदी विभागाच्या प्रमुख डॉ. सोनिया सिरसाट आणि महाविद्यालयाचे ग्रंथपाल समीर फट्टे हे या अभ्यासक्रमाचे मुख्य समन्वयक होते. या अभ्यासक्रमांचा समारोप सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांचे मनोगत झाले. पणजी येथील शारदा मंदिर शाळेच्या अध्यापिका अंकिता हळर्णकर, एम.ए.भाग दोनच्या विद्यार्थिनी संध्या शर्मा, एम.ए. हिंदी भाग एकच्या विद्यार्थी प्रवीण बुरंगे यांनी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाबद्दलची मते व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रियंका चव्हाण यांनी केले. तर आभार समीर फट्टे यांनी मानले.

या प्रमाणपत्र अभ्यासक्रमामध्ये गोवा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट साखळीचे ग्रंथपाल डॉ. तकाप्पा आर, डॉन बास्को कॉलेज ऑफ इंजिनियरिंग,फातोर्डा गोवाचे ग्रंथपाल डॉ.ान्सिस्को रोलँड रॉड्रिग्ज दा क्रूझ, नारायण झांट्ये कॉलेज ऑफ कॉमर्सचे ग्रंथपाल डॉ. बाळा मांद्रेकर, विद्याप्रबोधिनी कॉलेज ऑफ कॉमर्स एज्युकेशन, कम्प्युटर अँड मॅनेजमेंट आल्त पर्वरीचे ग्रंथपाल डॉ. नितेश नाईक, कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळीचे ग्रंथपाल समीर फट्टे आदी मान्यवर तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**विद्यार्थी आव्हानांचा मुकाबला सहजपणे करतील : प्राचार्य गावस**

जलदपणे विकसित होत असलेल्या शैक्षणिक जगात संदर्भ आणि पुरावे देऊन प्रभावीपणे लेखन करणे हे एक कौशल्य नाही तर काळाची गरज आहे. ही गरज ओळखून शैक्षणिक लेखन कौशल्ये : योग्य संदर्भ, उद्धरण आणि साहित्यिक चोरी प्रतिबंध या विषयावरील हा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे आयोजन केलेले होते. या अभ्यासक्रमामुळे भविष्यातील कोणत्याही आव्हानांचा मुकाबला विद्यार्थी सहजपणे करू, शकतात, असे उद्गार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी काढले. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमातून लेखन विषयक कौशल्ये आत्मसाद करून विद्यार्थी नक्कीच यश मिळवतील असा आत्मविश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# जीएमएच्या राज्य प्रश्नमंजुषा स्पर्धेत धेंपे महाविद्यालय अजिंक्य

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि.२२ :** कुजिरा बांबोळी येथील श्रीनिवास सिनाई धेंपे महाविद्यालयातील प्रथम वर्ष बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (व्यवस्थापन पदवी अभ्यासक्रम) शाखेतील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय बिझनेस प्रश्नमंजुषेत प्रथम क्रमांक पटकावला. ही स्पर्धा गोवा व्यवस्थापन मंडळ (मॅनॅजमेंट असोसिएशनच्या) ५० व्या स्थापना दिनानिमित्त मंडळाच्या सहकार्याने वसंत जोशी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन अभ्यासक्रम शाखेने आयोजित केली होती.

डेम्पो बीबीए शाखेच्या विजेत्या संघात सुमित साहू, सॅव्हिल फर्नांडिस आणि सॅम अफोन्सो यांचा समावेश होता. या स्पर्धेत राज्यातील सर्व आठही महाविद्यालयांनी भाग घेतला होता.

विजेत्या संघांना जीएमएचे अध्यक्ष दीपक बांदेकर, इम्मेडाइट अध्यक्ष अमीन लडक आणि एमईएस वसंत जोशी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मनस्वी कामत यांच्याहस्ते ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या. एसएस धेंपे कॉलेजच्या विजेत्या टीम सदस्यांसह बीबीए विभागाचे सहाय्यक प्राध्यापक विश्व पै रायकर यांचा एसएस धेंपे कॉलेजचे प्राचार्य प्रा. डॉ. मनोज कामत यांनी उपप्राचार्य प्रा. संगीता चक्रवर्ती, वरिष्ठ प्राध्यापक रवींद्रनाथ नायक आणि डेम्पो बीबीएच्या समन्वयक, सहाय्यक प्राध्यापक तानिया शिरोडकर यांच्या उपस्थितीत विजेत्या संघातील विद्यार्थ्यांचा सत्कार केला.



मडगाव: यशस्वी विद्यार्थ्यांसोबत प्राचार्य मनोज कामत व इतर मान्यवर


VILLAGE PANCHAYAT TIVIM, BARDEZ – GOA

No. VP/TIV/BAR/F./24-25/3189
Date: 22-03-2025

QUOTATION NOTICE

Quotations are invited from the Registered/Authorised dealers for the supply of Stationery & Printed Stationary for the office of the Village Panchayat Tivim, Bardez, Goa, for the Academic year **2025-26.**

Last date for submission of Quotation is 03-04-2025.

Quotation will be opened in the subsequent forthnightly Meeting of Village Panchayat.

Rate of material should specify the transportation charges, Sales tax, Vat tax, GST or any either tax if applicable. The right of accepting or rejecting any or all the quotations is reserved by the Village Panchayat Tivim without giving reasons thereof.

Sd/- ( Mr. Venkatesh Shirodkar )
Sarpanch
Village Panchayat Tivim. Seal

केंद्रीय सरकार, कंपनी रजिस्ट्रार, गोवा हांच्या समक्ष

मर्यादित दायित्व भागीदारी कायदा, २००८ च्या कलम १३ च्या उप–कलम (३) आणि मर्यादित दायित्व भागीदारी नियम, २००९ च्या नियम १७ ह्या विसयांत

आणि **RETIRO PROPTECH LLP ("LLP")** ह्या विसयांत, जाचें नोंदणीकृत कार्यालय Flat No S-1, G-Block, II, Flr, Westerlies Building, Colva, South Goa, Salcete, Goa, India, 403708, Email: vmrbuildcon@gmail.com ह्या पत्त्यार आसा.

सर्वसाधारण लोकांक हांगा ह्या वरवीं कळयता की, LLP न प्रस्तावीत आसा की ती मर्यादित दायित्व भागीदारी कायदा, २००८ च्या कलम १३ (३) आणि मर्यादित दायित्व भागीदारी नियम, २००९ च्या नियम १७ अंतर्गत नोंदणीकृत कार्यालयाच्या जागेच्या बदलाची सूचना दाखल करपाक, जाचें नोंदणीकृत कार्यालय "गोवा" राज्यांतल्यान "तेलंगणा" राज्यांत बदलपाक.

कोण्टीच व्यक्ती जाचो स्वार्थ कंपनीच्या प्रस्तावीत नोंदणीकृत कार्यालयाच्या बदलान प्रभावीत जावपाची शक्यताय आसा, ती व्यक्ती तांचे आक्षेप, जे शपथपत्रान समर्थीत आसात, जे ताच्याधतिच्या स्वार्थाची प्रकृती आणि विरोधाची कारणां उक्ता करतात, MCA-21 पोर्टल (www.mca.gov.in) वयल्यान गुंतवणूकदार तक्रार फॉर्म भरून दाखल करपाक वा दर्जेदार पोस्टान कंपनी रजिस्ट्रार, गोवा, Corporate Bhawan, EDC Complex, Plot No. 21, Patto, Panaji-403001, Goa आणि Central Registration Centre (CRC), Indian Institute of Corporate Affairs (IICA), Plot No. 6, 7, 8, Sector 5 IMT Manesar, District Gurgaon (Haryana), Pin Code-122050 हांगा ह्या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेंतल्यान २१ (एकविस) दिसांच्या भितर पाठोवपाक शकता, आणि LLP क ह्या वर उल्लेखिल्ल्या पत्त्यार ताच्या नोंदणीकृत कार्यालयार एक प्रत पाठोवपाक.

RETIRO PROPTECH LLP च्या वतीन
Sd/-
Vuddar Madhava Rao
तारीखः २३ मार्च २०२५ (नामनियुक्त भागीदार)
जागोः गोवा DPIN: 01685432

NOTICE

My Husband **Late Ajay Singh** was owning **Maruti Celerio X ZXI Car** bearing **Reg. No. GA-06-F-5566, Honda Activa 4G Scooter** bearing **Reg. No. GA-06-R-5566, Royal Enfield Bullet Electra Motorcycle** bearing **Reg. No. GA-06-Q-5566, Hero Pleasure Scooter** bearing **Reg. No. GA-06-H-5566 & JCB 3DX 2WD** bearing **Reg. No. GA-05-B-9876.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

**Date: 22.03.2025** Sd/- **Savita Ajay Singh**
H.No.143-I, Nr. Alto Dabolim Junction, Mormugao, South Goa 403801.

Sandeep Ads

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the general public that **Deed of Sale dated 21/06/1992 which is found registered with Sub-Registrar of Bardez vide Registration No. 1677, Book-I Document, Vol. No. 178 on 14/10/1992** pertaining to property under Survey No. 53/6 of Village Verla, situated at Verla, Bardez, Goa which was executed between Julia Berta Dantas E Pinto as Vendor and Mrs. Promodini Ganpat Prabhu alias Promhodini Ganpat Prabhu & Gaurish Prabhu has reported Lost/ Misplaced/ Stolen while doing shopping in market on Friday 21/02/25. Further I have taken every efforts to trace the said Original Documents in respect of property surveyed under survey bearing no. 53/6 of Village Verla and had also filed complaint before Mapusa Police Station. However the said lost documents are beyond recovery.

That any person/s having found the above mentioned Original Documents in respect of said property will rewarded and the same are required to intimate to the below mentioned address.

Mapusa, Dated 21/03/2025
Sd/- Lavoo Govind Haldankar
R/o House No. 9/C/9, Dattawadi, Mapusa, Bardez, Goa 403507 **Mob: 9158472779**


# विद्यार्थ्यांनी ज्ञान आणि नाविन्यांचा शोध घ्यावा..!

## व्यवस्थापक प्रमोद कुमार : केपे महाविद्यालयात आयओटीवरील कार्यशाळेचा समारोप

■ टीम दैनिक हेराल्ड

**केपे, दि. २२:** विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी ज्ञान आणि नाविन्यांचा सातत्याने शोध घेतला पाहिजे. या शोधात आयओटी (इंटरनेट ऑफ थिंग्ज) विषयावरील कार्यशाळा महत्त्वाची भूमिका बजावत असतात, असे प्रतिपादन आयईईई इंडियाचे शिक्षण वरिष्ठ व्यवस्थापक प्रमोद कुमार यांनी केले.

उच्च शिक्षण संचालनालय, पर्वरी, आदिवासी विकास विभाग आणि आयओटी विभाग कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय केपे व सी डॅक बंगळुरू (सीडीएसी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयओटी या विषयावरील (इंटरनेट ऑफ थिंग्ज) वर राज्यस्तरीय कार्यशाळेच्या समारोप सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून वरिष्ठ व्यवस्थापक प्रमोद कुमार बोलत होते.



केपे : कार्यशाळेच्या समारोपाप्रसंगी वरिष्ठ व्यवस्थापक प्रमोद कुमार, संचालक भूषण सावईकर, प्राचार्या डॉ.प्रवीणा केरकर, डॉ. कविता असनानी व इतर मान्यवर.

यावेळी व्यासपीठावर उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर, कार्यशाळेच्या मुख्य समन्वयक डॉ. कविता असनानी, केपे सरकारी महाविद्यालयातील आयओटी सेलच्या समन्वयक प्रा.ऑलिव्हिया सोरेस आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यशाळा समारोप सोहळ्याच्या सुरुवातीला मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यशाळेच्या मुख्य समन्वयक डॉ. कविता असनानी यांनी कार्यशाळेचा अहवाल, आयोजनामागची उद्दिष्टे स्पष्ट केली. यावेळी संचालक भूषण सावईकर, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर यांचे मनोगत झाले. संगणकशास्त्र आणि भौतिकशास्त्र या विषयातील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी या कार्यशाळेविषयी मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. स्नेहा देसाई यांनी केले. तर आभार प्रा.ऑलिव्हिया सोरेस यांनी मानले.

ज्ञान आणि कल्पनांच्या मौल्यवान देवाणघेवाणीसाठी, सहभागींना नवीन कौशल्ये आणि दृष्टिकोनांनी सज्ज करण्यासाठी एक नवे व्यासपीठ म्हणून इंटरनेट ऑफ थिंग्ज या कार्यशाळेने काम केलेले आहे – डॉ. कविता असनानी , मुख्य समन्वयक, आयओटी कार्यशाळा.

> शिक्षण आणि तंत्रज्ञान यांच्या वापरातून सामाजिक विकासास चालना मिळेल. आयओटी विषयावरील कार्यशाळेने शिक्षणातील गुणवत्तेचा दर्जा उंचावण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.
> – भूषण सावईकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पर्वरी.

आयओटी कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थी आणि प्राध्यापक यांची जबाबदारी वाढली असून विद्यार्थ्यांना करियरच्या अनुषंगाने संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही कार्यशाळा मार्गदर्शक ठरणार आहे – डॉ. प्रवीणा केरकर, प्राचार्या, सरकारी महाविद्यालय केपे.